
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०५





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

• शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणीअंक : ५

**संपादक मंडळ**

• प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे • प्रा.डॉ.मृदुला वर्मा • प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक :**

• प्रा.डॉ.पी.जी.गायकवाड • प्रा.डॉ.गोवर्धन दिकोंडा • प्रा.डॉ.सुरेश रामचंद्र ढेरे

**✻ प्रकाशक ✻**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी :** अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ महात्मा फुले यांचे शेती समस्येबाबत विचार
– डॉ.अनिल कांबळे, सोलापूर ---------- ११

२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेत 'मूकनायक' या वृत्तपत्राचे योगदान
– प्रा. आप्पासाहेब केंगार, भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली ---------- १५

३ महात्मा ज्योतिराव फुले : २१ व्या शतकात समजून घेतांना
– प्रा.अरुणा वाघोले, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे ---------- २०

४ महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य : ऐतिहासिक अभ्यास
– डॉ.बाळासाहेब काळे, इंदापूर, जि.पुणे ---------- २७

५ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्यातील विचार आणि योगदान
– प्रा.शैलेष भालेराव, पाषाण, जि.पुणे ---------- ३१

६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याणविषयक योगदान
– डॉ.चंद्रकांत भारसाकळे, इस्लामपूर, जि.सांगली ---------- ३६

७ महात्मा ज्योतिबा फुले : एक थोर समाजसुधारक
– श्री.अजित चव्हाण, बार्शी, जि.सोलापूर ---------- ४१

८ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुसूचित जातींसाठी सामाजिक न्यायाचे योगदान
– प्रा.गीतांजली चव्हाण, लोणी काळभोर, ता.हवेली, जि.पुणे ---------- ४६

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संसदीय लोकशाही विषयीचे विचार
– प्रा.दादासाहेब हाके, माढा, जि.सोलापूर ---------- ४९

१० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक व व्यक्तीविषयक विचार – एक सामाजिक आकलन
– प्रा.दशरथ रसाळ, सोलापूर ---------- ५३

११ महात्मा फुले –एक कृतिशील समाजसुधारक
– प्रा.बाळासाहेब देवकाते, कर्जत, जि.अहमदनगर ---------- ५६

१२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजशास्त्र व समाज कार्यातील योगदान
– डॉ.नागोराव भुरके, सोलापूर ---------- ५९

१३ महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले : लोकोत्तर पुरुष
– डॉ.अतुल कदम, भोसरे, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर ---------- ६२

१४ सत्यशोधक समाज आणि क्रियाशील सत्यशोधक
– डॉ.गोवर्धन दिर्कोंडा, माढा, जि.सोलापूर ---------- ६६

१५ आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
– प्रा.महादेव डिसले, बार्शी, जि. सोलापूर ---------- ७०

१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही समाजवाद आणि आर्थिक विषमतेबाबतचे विचार
– प्रा.महेंद्र गजधाने, पंढरपूर ---------- ७५

१७ महात्मा फुले यांच्या साहित्यातील मानवतावाद – डॉ.नामदेव शिंदे, माढा, जि.सोलापूर ---------- ७७

१८ महिलांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांचे योगदान
– डॉ.पौर्णिमा चव्हाण, आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली ---------- ८०

ISSN No. 2394-5990

६१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता : संदर्भ बहिष्कृत भारतमधील अग्रलेख -
– प्रा.सचिन कांबळे, पुणे ---------- २५१

६२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि भटक्या विमुक्त जाती जमाती
– प्रा.सचीन साळवे, लोणी-काळभोर, जि.पुणे. ---------- २५७

६३ साहित्यिक जोतीराव फुले – प्रा.संजय साठे, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ---------- २६२

६४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पाकिस्तान संबंधीचे विचार – प्रा.संतोष कारभारी, पुणे ---------- २६६

६५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिव्यवस्थेच्या उगमासंबंधीचे विचार
– प्रा.संतोष मरकवाड, एल.बी.पी.एम. कॉलेज, सोलापूर. ---------- २७०

६६ समाजसुधारक महात्मा फुले – प्रा.सरला चव्हाण, करमाळा, जि.सोलापूर ---------- २७५

६७ सामाजिक विषमता व काळाराम मंदिर सत्याग्रह – प्रा.शंकर आवारे, नाशिक ---------- २८२

६८ महात्मा फुलेंचे शेती विषयक विचार – प्रा.बप्पासाहेब शेजूळ, कुर्डूवाडी, जि.सोलापूर ---------- २८६

६९ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीसबलीकरणातील योगदान – डॉ.शिल्पा शेटे, शिरूर, पुणे ---------- २८८

७० महात्मा जोतिबा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेले निवेदन–एक अभ्यास
– डॉ.शिवाजी वाघमोडे, जेऊर, जि.सोलापूर ---------- २९२

७१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : चलन, शेती, कामगार, उद्योगधंदे
– प्रा.सुभाष शिंदे, वाघोली, जि.पुणे. ---------- २९८

७२ महात्मा फुले यांचे शेतकरी प्रश्नांविषयी विचार
– प्रा.सुनिल राजपूत, अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद ---------- ३०२

७३ बहिष्कृत हितकारिणी सभा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा.सुप्रिया पवार, श्रीगोंदा ---------- ३०६

७४ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार – प्रा.डॉ.महादेव थोरात, कुर्डुवाडी ---------- ३११

७५ महात्मा फुलेंच्या शिक्षण विषयक विचारांचे महत्त्व – प्रा.डॉ.महादेव थोरात, कुर्डुवाडी. ---------- ३१३

७६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य – डॉ.कल्याण वटाणे, पंढरपूर ---------- ३१५

७७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास
– डॉ.यशवंत साळुंके, दिंडोरी, जि.नाशिक. ---------- ३१७

७८ ज्ञानयोगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर – प्रा.धनंजय मोगले, सोलापूर ---------- ३२१

७९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मपरिवर्तन : एक ऐतिहासिक अवलोकन– प्रा.सुमन केंद्रे, पंढरपूर ३२५

८० डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समताधिष्ठित समाजनिर्मितीचा लढा
– प्रा.समाधान लोंढे, बार्शी, जि.सोलापूर. ---------- ३२८

८१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही आणि सद्यस्थिती
– डॉ.शारदा कदम, वसमत, जि.हिंगोली. ---------- ३३१

८२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी सुधारणावादी विचार: सध्यस्थितीची गरज
– १. डॉ. दत्तात्रय निवृतीराव घोडके, पुणे २. प्रा.चारुता प्रताप वगरे, कोल्हापूर ---------- ३३३

८४ **Mahatma Phule: A Charismatic Writer of the Masses of Modern India**
– **Dr.Anand Hipparkar, Karjat, Dist. Ahmednagar** ---------- ३३७

८४ **Ambedkar and Dalit Women: The Long-Lasting Legacy of His Discourse on Women Empowerment - Dr.Anisha Shrivastava, Gaziabad, UP** ---------- ३४२

ISSN No 2394-5990

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास

डॉ. यशवंत मुरलीधर साळुंके
प्राध्यापक,
के. आर. टी कला आणि वाणिज्य महाविद्यालय वणी, ता.दिंडोरी, जि.नाशिक, महाराष्ट्र,
Email : yashvantsalunke501@gmail.com मो.९८२३५४२३११

**गोषवारा :**

आधुनिक भारताची वैचारिक जडण - घडण ज्या श्रेष्ठ राजकीय व सामाजिक वैचारिकतेतुन झाली, त्यापैकी एक डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे होय. दलितांबरोबर अर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी डॉ.आंबेडकर आयुष्यभर झटले. पण हे कार्य करीत असताना भारताची एकात्मता, लोकशाही यांना धोका पोहोचणार नाही या ची त्यांनी सतत काळजी घेतली. ते दलितांचे नेते होते तसेच प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांच्या कार्यामध्ये दलितांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारा नेता आणि राष्ट्रवादी नेता या भूमिकांचा समन्वय आढळतो. ऐतिहासिक कर्तृत्वाप्रमाणेच वैचारिक क्षेत्रातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. डॉ.आंबेडकरांच्या राजकीय व सामाजिक विचारांची जडणघडण भारतीय आणि पाश्चिमात्य विचार आभ्यास संस्कारातून झाली. भारतीय संदर्भात भगवान बुद्ध, महात्मा फुले आणि कबीर यांचे विचार आत्मसात केले. पाश्चिमात्य संदर्भात उदारमतवादी राजकीय विचार परंपरेचा जबरदस्त प्रभाव त्यांच्या विचारावर उमटला. डॉ.आंबेडकरांनी राज्यशासन विषयक विचार मिल आणि जेफरसन यांच्याकडून घेतलेले होते. डॉ.आंबेडकरांचे विचार पूर्णपणे समजून घेण्यासाठी त्यांचे लेख, भाषणांचे संग्रह, 'भारत' आणि 'मूकनायक' वृत्तपत्रातील विचार आणि ग्रंथरचना अभ्यासावी लागते.हीच खरी आंबेडकरी राजकीय विचारांची खरी उगमस्थाने आहेत. या सर्वांच्या आधारे डॉ.आंबेडकर यांचे राजकीय विचारांचा परामर्श प्रस्तुत संशोधन लेखात घेतला आहे.

**सूचनक शब्द (Keywords) :** आंबेडकरवाद, राजकीय लोकशाही, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद.

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय व सामाजिक विचार पूर्णपणे समजून घेण्यासाठी प्रामुख्याने डॉ.आंबेडकर लिखित द प्रॉब्लेम ऑफ रूपी, स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया ॲन्ड देअर रेमेडिज, शूद्र कोण होते?, भाषिक राज्याविषयी विचार, एनशिएंट इंडियन कॉमर्स, नॅशनल डेव्हिडंड ऑफ इंडिया हिस्टॉरीकल ॲन्ड एनॅलॅटिकल स्टडी, द इव्हॅल्युएशन ऑफ प्रॉव्हिन्सिअल फायनान्स ब्रिटिश इंडिया इ. ग्रंथसंपदा, तसेच डॉ.आंबेडकरांनी चालवलेली 'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायक' वृत्तपत्रे यातून त्यांचे फार मोठे योगदान वैचारिक क्षेत्राला आहे. राष्ट्रवाद ही एक व्यक्तीनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. राष्ट्रवादाची शक्तीला बलाढ्य साम्राज्ये उलथवून टाकणे सहज शक्य होते. राष्ट्रवादाची शक्ती जितकी विध्वसंक तितकीच ती विधायक आहे. आर्थिक विषमता, सामाजिक उच्च-नीचता आणि भेदभावांवर मात करून समाजाचे ऐक्य बळकट करण्याचे सुप्त सामर्थ्य राष्ट्रवादाच्या ठिकाणी असते. राज्यशास्त्राच्या भाषेत राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांचा संबंध देशभक्तीच्या आणि एकतेच्या भावनेशी असतो असे म्हणावे लागेल. आपआपसातले भेदभाव नष्ट करावेत म्हणजे तो अधिक शक्तिशाली होईल असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मत होते. भेदभाव दडपणारा राष्ट्रवाद टिकाऊ होऊ शकत नाही असा त्यांचा सिद्धांत होता. याचा अर्थ आंबेडकरी राष्ट्रवादाचा उगम दलित-शोषितांविषयीच्या कळवळ्याचा होता. जोपर्यंत हा वर्ग दास्य-दरिद्र्यातून मुक्त होणार नाही तो पर्यंत खरा राष्ट्रवाद निर्माण होणार नाही अशी त्यांची भूमिका होती. समान संधी आणि मानवी हक्क अनेक शतकांपासून ज्या समाजाला नाकारण्यात आले, त्या समाजावरील अन्याय दूर झाल्याशिवाय राष्ट्रबांधणी शक्य नाही असा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार होता याच विचाराच्या आधारे त्यांचे राजकीय आणि सामाजिक विचारविश्व पुढीलप्रमाणे अभ्यासता येते.

**लोकशाही विषयक विचार :**

लोकशाही सामान्य वर्गाला प्रतिष्ठा मिळवून देते. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून ती एक जीवनपद्धती असते या लास्कीच्या विधानाचा प्रभाव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर आढळतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारात जर सर्वात महत्त्वाचा घटक कोणता असेल तर तो त्यांनी लोकशाहीचा सांगितलेला

व्यापक अर्थ त्यांनी राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची कल्पना मांडली आणि त्या कल्पनांचा सातत्याने पाठपुरावा केला. प्रत्येक देशात पुर्वीपासून चालत आलेला एक सत्ता चालवणारा वर्ग असतो. अशा वर्गाची अनियंत्रित सत्ता डॉ.आंबेडकर यांना मान्य नव्हती. सामान्य वर्गांना सत्ता प्राप्त व्हावी असे त्यांना वाटत होते. त्यासाठी सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धती हे साधन बनावे. डॉ.आंबेडकरांच्या मते व्यक्तीला काही अदेय हक्क असतात व संविधानाने त्या हक्कांची हमी त्याला दिली पाहिजे, व्यक्ती हेच एकमेव साधन आहे, कोणत्याही विशेषाधिकाराच्या प्रातीखातर व्यक्तीला आपल्या संविधानिक हक्कांचा त्याग करावा लागू नये, इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्थेकडून कोणत्याही खाजगी व्यक्तींना दिली जाता कामा नये. राजकीय लोकशाहीची उभारणी या चार गृहितांवर झालेली असते. त्यांनी याच कारणासाठी साम्यवादी राजवटीवरसुद्धा टीका केली. हक्कांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना प्राप्त होणे हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ निकष आहे. अल्पसंख्यांकानी बहुसंख्यांकाचे निर्णय मान्य करावेत. अल्पसंख्यांकांच्या हितसंबधांना संरक्षण देण्याचे सौजन्य बहुसंख्याकांजवळ पाहिजे मानवाच्या हक्कांना संरक्षण आणि कल्याण होणेसाठी लोकमतावर आधारित प्रबळ शासनाची गरज असते. या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संघराज्य पद्धतीपेक्षा एकात्म पद्धतीची शासनप्रणाली अधिक चांगली वाटत होती. म्हणून त्यांनी इ.स. १९३५ च्या कायद्यामधील संघराज्यात्मक तरतुदींना विरोध केलेला होता. डॉ.आंबेडकरांनी घटना परिषदेत संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. मात्र आपल्या स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज' या पुस्तकात त्यांनी संसदीय पद्धतीचे समर्थन केलेले नव्हते. त्यांच्या मते भारतातील अल्पमत किंवा बहुमत जातीवाचक होण्याची शक्यता आहे. जातीय बहुसंख्यांकांकडून अल्पसंख्याकांवर अन्याय होण्याची शक्यता असते. बहुसंख्यांक जातिगटाचे वर्चस्व कायम स्वरुपात राहते. अशा परिस्थितीत अमेरिकेसारखी अध्यक्षीय पद्धती स्वीकारणे अधिक योग्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केलेले होते. मात्र पुढे त्यांच्या विचारात बदल झाले. त्यांना घटना परिषदेत तडजोड करावी लागली. या पार्श्वभूमीवर त्यांनी नंतर संसदीय पद्धतीचे समर्थन केले. 'संसदीय लोकशाही' या पुस्तिकेत ते असे म्हणतात की, संसदीय पद्धतीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकते. निर्णय मनमोकळ्या चर्चेअंती व सर्वांच्या संमतीने घेण्याची तरतूद फक्त संसदीय पद्धतीतच असते. सन्मानित विरोधी पक्ष, स्वतंत्र वृत्तपत्रे आणि मुक्त व न्याय्य निवडणुका ही संसदीय लोकशाहीचे वैशिष्ट्ये डॉ.आंबेडकरांना महत्त्वाची वाटतात. शासनाला हुकूमशाही पासून सुरक्षित ठेवण्याचे कार्य त्यातून पार पडते. डॉ.आंबेडकरांना भारतात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण करावयाची होती. राजकीय लोकशाही राज्यघटनेच्या माध्यमातून निर्माण झाली. पण लोकशाहीचा प्रवास इथेच थांबून चालणार नाही. भारतात स्थापन झालेल्या राजकीय लोकशाहीने पुढे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करावी तरच लोकशाही परिपूर्ण होईल हे आंबेडकरी विचाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानावे लागेल. राजकीय क्षेत्रापासून सुरु झाली लोकशाहीची प्रक्रिया हळूहळू सामाजिक, आर्थिक क्षेत्राकडे मार्गक्रित होते. केवळ स्वातंत्र्यावरच लक्ष केंद्रित करून आर्थिक विषमतेकडे दुर्लक्ष झाल्यास संसदीय लोकशाही उपायकारक ठरू शकत नाही.आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीकडे दुर्लक्ष करुन राजकीय लोकशाही फार काळ टिकणार नाही असे डॉ.आंबेडकर म्हणतात. लोकशाहीकरणाची प्रक्रिया केवळ शासनावरच न थांबता ती समाजापर्यंत पोहचली पाहिजे. सामाजिक सुधारणेखेरीज राजकीय सुधारणा व्यर्थ आहे असे त्यांचे मत होते. राजकीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी समाजात सामाजिक लोकशाहीची स्थापना होणे आवश्यक आहे. ज्या समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता असते तिथे सामाजिक लोकशाही निर्माण होते. जातीव्यवस्थेचा शेवट होऊन समताधिष्ठित समाज निर्माण होणे म्हणजेच सामाजिक लोकशाहीची स्थापना होणे होय. दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी समाज परिवर्तन आवश्यक आहे . केवळ राजकीय यंत्रणा फार काही करु शकणार नाही. अमेरिकेतील निग्रो, जर्मनीतील यहुदी आणि भारतातील अस्पृश्य यांच्या उदाहरणांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विचार स्पष्ट करतात. थोडक्यात लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून तो समाजचाही प्रकार असतो. डॉ.आंबेडकर आर्थिक लोकशाहीचे स्पष्टीकरण करतांना म्हणतात. सामान्य जनतेची आर्थिक विषमता नष्ट होवून, सर्वांच्य मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. यासाठीच राज्य समाजवादाचा स्वीकार केला पाहिजे. राज्य समाजवादानुसार शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. मोठे उद्योगधंदे शासनाच्या ताब्यात असावेत. उत्पादन वाढ आणि उत्पादित मालांचे न्याय्य

वाटप हे त्यांच्या आर्थिक विचाराचे वैशिष्ट्ये आहेत. गरिबी, बेकारी दारिद्र्य जर सतत वाढत राहिले तर भारताच्या लोकशाहीला धोका होण्याचा इशारा डॉ. आंबेडकरांनी दिला. लोकशाही आदर्श होण्यासाठी त्यांनी अनेक उपाय सुचविले. कायद्यासमोर व प्रशासनात समानता, संविधानिक नीतिमत्ता, जनतेत कर्तव्य भावना निर्माण होणे याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. व्यक्तीपूजा आणि घराणेशाही याला त्यांनी अतिशय प्रखर विरोध केला. अनेक पक्षपद्धती आणि प्रबळ विरोधी पक्ष यावरही भर दिला. राजकीय पक्ष अधिक प्रमाणात निर्माण होणे आणि एका पक्षाची मक्तेदारी वाढणे या दोन्ही गोष्टींना आळा बसावा असे त्यांना वाटे. कमीत कमी दोन पक्ष असावेत; पण राजकीय पक्षांची संख्या फार वाढल्यास अस्थिरता वाढते असे त्यांचे मत होते. आजच्या काळात त्यांचे मत समर्पक ठरते. त्यामुळे लोकशाहीविषयीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

**धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्याने दलितांची स्थिती सुधारणार नाही. परंतु असे असले तरी डॉ. आंबेडकर यांनी ब्रिटिश राजवटीवर सडेतोड टीका केली. डॉ. आंबेडकर यांना देशाचे स्वातंत्र्य बरोबर जनतेचे स्वातंत्र्य प्रथम हवे होते. डॉ. आंबेडकरांच्या मते अनेक स्वतंत्र देशांची जनता परतंत्र असते. परकीय राज्यकर्ते निघून गेल्यानंतरही त्या जनतेची गुलामगिरी कायमच राहते. उदाहरणार्थ अमेरिकेतील निग्रो होय. जोपर्यंत सर्व सामान्य जनता गरजा, भय, छळ, आणि शोषण यापासून मुक्त होत नाही तोपर्यंत खरे स्वातंत्र्य मिळणार नाही. न्याय्य तत्त्वांच्या आधारे सामाजिक व आर्थिक फेररचना झाल्याखेरीज खरा एकसारखा समाज निर्माण होऊ शकत नाही. एकसारखा समाज जर नसेल तर राष्ट्रवाद निर्माण होणे कठीण आहे असा डॉ. आंबेडकर यांचा सिद्धांत होता.

जातीव्यवस्थेमुळे समाजात तडे पडतात. 'जात' ही एक मानसिकता आहे. राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांच्या निर्मितीमधील सर्वात मोठी समस्या म्हणजे जातीव्यवस्था होय यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते. भारत हे 'राष्ट्र' बनावे अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होत. जातीची भावना देशद्रोही भावना असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या पार्श्वभुमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी राजकारण समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अव्वल दर्जाचे राष्ट्रभक्त होते असा इतिहासाचा दाखला आहे. या राष्ट्रभक्तीमध्ये दलित मुक्तीच्या मध्यवर्ती चिंता आणि चिंतन यांना अग्रक्रम विशिष्ट स्थान होते. दलितांचे हित आणि राष्ट्राचे हित या दोन्ही संदर्भांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मन भारलेले होते. म्हणूनच भारतीय संस्कृतीशी घट्ट जोडलेला, या मातीच्या कुशीतूनच जन्मलेला बौद्ध धर्म त्यांनी स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रत्व केवळ राजकीय नव्हते तर आत्मिक-सांस्कृतिक स्वरूपाचे होते. मानसिक एकात्मतेतून साध्य होणारे सामाजिक ऐक्य त्यांना हवे होते. राष्ट्रवादाचे उग्र स्वरूप त्यांना मान्य नव्हते. त्यांचा राष्ट्रवाद देखील महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या राष्ट्रवादाप्रमाणे आंतरराष्ट्रवादाकडे जाणारा होता. दहशतवादी, इतर देशांचा द्वेष करणारा राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष, बुद्धिप्रामाण्यवादी, पुरोगामी होता तसाच तो शांततावादी आणि अनाक्रमकही होता. परकीय राजवटीपेक्षाही भारतीय सनातनीपणाला त्यांनी धारेवर धरले. हिंदू राष्ट्रवाद ही संकल्पना त्यांना निरर्थक वाटते. देशात बहुसंख्येने असणाऱ्यांच्या धर्माशी राष्ट्रवादाशी सांगड घालणे त्यांना मान्य नव्हते. अल्पसंख्यांकांनी जर सत्तेत भागीदारी मागितली तरी त्याला जमातवाद किंवा सांप्रदायिकता म्हणायचे आणि बहुसंख्याकांनी धार्मिक आधारावर सत्ताकारण केले की त्याला राष्ट्रवाद म्हणायचे या प्रवृत्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अतिशय कठोर टीका करतात. भारताचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष असावा असा त्यांचा आग्रह होता.

**राज्यसंस्था आणि शासनसंस्था भूमिका :**

राज्यसंस्था आवश्यक आहे. मात्र राज्य हे साध्य नसून व्यक्तीविकासाचे साधन आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटते. राज्याच्या उत्पत्तीच्या दैवी सिद्धांतास डॉ. आंबेडकर विरोध करतात. राज्याचे कार्य केवळ शांता आणि सुव्यवस्था स्थापित करण्यापुरतेच मर्यादित नसुन प्रमुख कार्य लोककल्याण साधणे हे आहे. डॉ. आंबेडकर कल्याणकारी राज्याचे समर्थक होते. आर्थिक आणि सामाजिक समानता प्रस्थापित करण्याची जबाबदारी राज्याची आहे. समानतेबरोबरच स्वातंत्र्याचे वातावरण राज्यांनी निर्माण करायला पाहिजे. आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक क्षेत्रातील स्वातंत्र्यावर त्यांचा भर होता. स्वातंत्र्यामुळे प्रत्येक नागरिकाला सुरक्षितपणे जगण्याचा, आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार प्राप्त होतो, त्यांचे सरक्षण करण्याची जबाबदारी राज्याची असते. त्यासाठी शक्तिशाली राज्यासंस्थेची आवश्यकता त्यांनी

सांगितली. पण शक्तिशाली म्हणजे अनियंत्रित नव्हे, असे डॉ.आंबेडकर यांचे मत होते. व्यक्तीच्या अधिकारावर आणि स्वातंत्र्यावर वाजवी बंधने टाकण्याचा अधिकार राज्याला आहे. ब्रिटन आणि अमेरिकेतील लोकशाही संस्थांचा आणि तेथील उदारमतवादाचा प्रभाव डॉ.आंबेडकरांवर होता. अमेरिकेच्या राजकीय व्यवस्थेने स्वीकारलेल्या सत्ता विभाजनाच्या सिद्धांतामुळे ते प्रभावित झाले. भारतात संसदीय शासन पद्धती चांगली राबविली जावी यासाठी त्यांनी काही मार्ग सुचविले. ते म्हणजे अल्पसंख्यांकाचा ज्या प्रतिनिधीवर विश्वास नाही अशा बहुसंख्याकांच्या प्रतिनिधींना मंत्रिमंडळात घेतले जाऊ नये, स्थिर मंत्रिमंडळाच्या निर्मितीसाठी कार्यक्षम प्रशासनाच्या स्थापनेवर भर दिला पाहिजे. दररोजच्या राज्यकारभारावर बहुसंख्याकांचे नियंत्रण असू नये. बहुसंख्यांकांना शासन स्थापन करण्याची परवानगी देण्याअगोदर अल्पसंख्यांकांना त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी संधी दिली जावी. सामाजिक बदल घडवून आणण्याच्या संदर्भातील विधिमंडळांनी मंजूर केलेल्या कायद्याची अंमलबजावणी त्वरित व्हावी असा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता.

**साम्यवाद व लोकशाही समन्वयक अशक्य :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना साम्यवाद मान्य नाही. साम्यवाद आणि लोकशाही यांचा समन्वय शक्य नाही असे त्यांचे मत होते. रशियातील तत्कालिन एकपक्षीय राजवट त्यांना मान्य नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार वर्गसंघषपिक्षा वर्गसमन्वयास अधिक अनुकूल होते. त्याचप्रमाणे ते अहिंसेचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांना साम्यवादातील सशस्त्र क्रांती मान्य नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर धर्माचे अस्तित्व मान्य करतात. बुद्धिप्रामाण्यवादाच्या आधारे धर्मातील अनिष्ट गोष्टी नष्ट व्हाव्यात हे त्यांना मान्य आहे. पण पूर्ण धर्मसंस्थेचाच नायनाट करावा ही धर्मविरोधी भूमिका डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नाही. याही मुद्यावर त्यांचे साम्यवाद्यांशी मतभेद होते स्टॅलिनच्या काळात तर हुकूमशाही अधिकच उग्र बनलेली होती. मार्क्सने कामगारांची हुकूमशाही सांगितली परंतु स्टॅलिनने स्वत:ची हुकुमशाही निर्माण केली. अशा हुकुमशाहीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाठींबा देणे शक्य नव्हते. ते स्वातंत्र्य व समता या घटकांना महत्व देत. साम्यवादी विचार व्यक्तीस्वातंत्र्य विरोधी असल्याने त्यांना साम्यवादी विचार मान्य नव्हता. थोडक्यात राज्यसंस्थेत लोकशाही तत्वानुसार लोकांचा सहभाग यावर डॉ.आंबेडकरांचा विश्वास होता. साम्यवादात हुकुमशाही निर्माण होण्याची शक्यता असते म्हणुन साम्यवाद व लोकशाही यांचा समन्वय अशक्य आहे.

थोडक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचार विश्वाचे अनेक घटक आपण अभ्यासल्या असता असे म्हणता येईल. या सर्व घटकांना एकत्र करून 'आंबेडकरवाद' हे तत्त्वज्ञान निर्माण करता येईल. आंबेडकरवाद ही राजकीय विचारप्रणाली आहे. या राजकीय विचाराला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथलेखन आणि वृत्तपत्रीय लेखन मोठ्या प्रमाणात आहे. या सर्व लेखनाचे तत्व माणुसकी आणि समता या तत्त्वांशी संबंधित आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारात सामान्य समाजाला न्याय व हक्क या तत्वांनुसार चांगले जीवन मिळावे हा उद्देश दिसून येतो.

**संदर्भ साधने :**

१. खैरमाडे चांगदेव, डॉ.भिमराव रामजी आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.
२. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा), मराठी विश्वकोश, खंड १, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई, २०००.
३. साबळे. आर. डी., भारतीय राजकीय विचार, हिमालया पब्लिशिंग हाउस, नागपूर, २००३.

●●●